अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 25 जून 2026 | वर्ष 11 वे | अंक 46 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# बोगस प्रमाणपत्रे देऊन लाटली ३५ कोटींची कंत्राटे

## गोसीखुर्द जलसिंचन घोटाळा: ०७ बड्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदारांवर गुन्हे दाखल

### कार्यकारी संचालकांच्या स्तरावर "मंजुरी"चा खेळ

ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत (VIDC) बहुचर्चित गोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील भ्रष्टाचाराची दोन धक्कादायक प्रकरणे समोर आली आहेत. गोसीखुर्द प्रकल्पांतर्गत 'घोडाझरी शाखा कालव्याच्या' वेगवेगळ्या टप्प्यांतील कामांमध्ये कंत्राटदारांनी चक्क बनावट अनुभव प्रमाणपत्रे सादर करून शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB), चंद्रपूरचे पोलीस उपअधीक्षक अनिल मोहनरेड्डी जिट्टावार यांच्या फिर्यादीवरून ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात जलसंपदा विभागाचे तत्कालीन ७ बडे अधिकारी (काही अधिकारी दोन्ही गुन्ह्यांत समान) आणि कंत्राटदार कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध ब्रम्हपुरी पोलिस ठाण्यात दिनांक १९ जून २०२६ ला दोन स्वतंत्र गुन्हे



दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे जलसंपदा विभाग आणि कंत्राटदार वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल जनहित याचिका (क्र. ९२/२०१२ आणि ८३/२०१२) च्या अनुषंगाने गृह विभाग आणि लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो मुंबईच्या आदेशानुसार या कामांची उघड चौकशी करण्यात आली होती. चौकशीत या संपूर्ण प्रक्रियेत सुरुवातीपासूनच मोठा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले.

**प्रकरण १: मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शनकडून २० कोटी ४७ लाखांचा डाका :** घोडाझरी शाखा कालवा (सा.क्रं. ० मी. ते ४२६० मी.) चे मातीकाम व कट अँड कव्हरचे बांधकाम करण्यासाठी २००६ मध्ये मूळ निविदा १७ कोटी ५२ लाख ९१ हजार २८८ रुपये किमतीची होती.

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# आंतरराज्य टोळीतील सराईत गुन्हेगार २४ तासांत गजाआड

### चोरीच्या मुद्देमालासह चौघांना अटक

ब्रम्हपुरी/का.प्र.

बँकेतून पैसे काढून आलेल्या एका नागरिकाची नजर चुकवून ३० हजार रुपयांची रोकड लंपास करणाऱ्या आंतरराज्य टोळीतील सराईत गुन्हेगारांना ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने (DB Squad) अत्यंत कौशल्याने अवघ्या २४ तासांच्या आत जेरबंद केले आहे. पोलिसांच्या या तत्पर कामगिरीमुळे चोरी गेलेली संपूर्ण रक्कम, बँक पासबुक आणि गुन्ह्यात वापरलेल्या दोन



मोटारसायकली जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

२२ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास फिर्यादी रामचंद्र सखाराम मोहुर्ले (रा. अडयाळ जॉनी, ता. ब्रम्हपुरी) यांनी येथील सी.डी.सी.सी. बँकेतून ३०,००० रुपये काढले. ते पैसे त्यांनी एका कापडी थैलीत ठेवले आणि मुलीच्या कास्ट सर्टिफिकेटच्या कामासाठी ते तहसील कार्यालयातील सेतू केंद्रात गेले. तेथे काम करत असताना त्यांनी पैशाची थैली बाजूला ठेवली. याच दरम्यान मागून कोणीतरी आवाज दिल्याचा भास झाल्याने रामचंद्र यांनी मागे वळून पाहिले. मात्र, मागे कोणीच नव्हते. संशय आल्याने त्यांनी तात्काळ बाजूला पाहिले असता, त्यांची पैशांची कापडी पिशवी गायब झाली होती. त्यांनी परिसरात आरडाओरड करून शोध घेतला, मात्र पिशवी मिळून आली नाही. अखेर त्यांनी थेट ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ५४०/२०२६, कलम ३०३ (२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला.

पथकातील अधिकारी व अंमलदारांनी गुप्त माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे अत्यंत वेगाने चक्र फिरवली. तपासाची चक्रे वेगाने हलवत पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत आंतरराज्य टोळीतील सराईत गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. यात रिहान सिकंदर सिसोदिया वय २१ वर्ष, धंदा मजूरी, रितिक नीरज सिसोदिया वय २५ वर्ष धंदा मजूरी, प्रकाश गजराज सिंग सिसोदिया वय २६ वर्ष, असवंत भारतसिंग सिसोदिया वय २८ वर्ष चारही रा. कडिया सासी ता. पचोर, जि. राजगड (मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे. आरोपींची कसून झडती घेतली असता, त्यांच्याकडून चोरी गेलेले ३० हजार रुपये, फिर्यादीचे बँक पासबुक आणि गुन्ह्यासाठी वापरलेल्या दोन मोटारसायकली (मोसा) हस्तगत करण्यात आल्या. पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हा उघडकीस आणण्यात ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस हवालदार मुकेश गजबे, पोलीस अंमलदार प्रवीण भिवगडे, निलेश तुमसरे, इर्शाद खान, स्वप्नील पळसपगार आणि वशिष्ट रंगारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार मुकेश गजबे करीत आहेत.

❃❃❃❃❃❃



## संपादकीय...

# जनतेचे प्रश्न मार्गी लावा!

महाराष्ट्र विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत असताना राज्याचे राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये रंगलेला वाद हा केवळ दोन राजकीय विचारसरणींमधील सत्तासंघर्ष नसून, राज्याच्या भवितव्याशी आणि जनतेच्या ज्वलंत प्रश्नांशी जोडलेला एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना दिलेला 'राजकारण केल्यास राजकीय आणि समाजकारण केल्यास सामाजिक उत्तर मिळेल' हा स्पष्ट पवित्रा आणि दुसरीकडे विरोधकांनी सरकारच्या कथित निष्क्रियतेचा पाढा वाचत चहापानाच्या अधिकृत कार्यक्रमावर टाकलेला जाहीर बहिष्कार, या दोन्ही घटनांमधून राज्याच्या राजकीय संस्कृतीतील वाढती कटुता आणि आगामी काळातील रणनीती स्पष्टपणे समोर येते.

लोकशाहीमध्ये विधिमंडळ अधिवेशनाचा मुख्य उद्देश जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर चर्चा करून योग्य मार्ग काढणे हा असतो, मात्र सध्याची परिस्थिती पाहता हा हेतू साध्य होणार की नाही, यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शेतकरी कर्जमाफीचा विषय असो की 'एल निनो'मुळे उद्भवलेले भीषण नैसर्गिक संकट, सरकारने राजकीय गणितांच्या पलीकडे जाऊन काही कठोर पण अत्यंत आवश्यक निर्णय घेण्याला प्राधान्य दिले आहे. केवळ तात्पुरती कर्जमाफी देऊन मूळ प्रश्न सुटणार नाही, तर शेतकऱ्याला पुन्हा आर्थिक संकटातून उभे करून त्याला नव्याने कर्ज मिळवून देण्याची कायदेशीर क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे, हा सरकारचा विचार कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरतो. त्यातच जून महिना संपत आला तरी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असल्याने निर्माण झालेली चिंताजनक परिस्थिती पाहता, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असे केलेले जाहीर आवाहन आणि आगामी काळातील तीव्र जलटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने पाणी उपशावर घातलेली बंदी हे निर्णय एका जबाबदार शासनव्यवस्थेचे लक्षण मानले पाहिजेत. हे निर्णय राजकीयदृष्ट्या कदाचित लोकप्रिय नसले, तरी भविष्यातील मोठे जलसंकट टाळण्यासाठी ते आवश्यक ठरतात. यासोबतच, या अधिवेशनात केवळ राजकीय चिखलफेक न करता अत्यंत महत्त्वाचे कायदेशीर निर्णय घेण्याचा सरकारचा मानस आहे.

राज्याची कायदा-सुव्यवस्था, वाढती बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या मालाला मिळणारा हमीभाव आणि भ्रष्टाचार या मुद्द्यांवरून विरोधकांनी सरकारला पूर्णपणे धारेवर धरले आहे. राज्याची ऐतिहासिक परंपरा आणि विकास धोक्यात आल्याचा आरोप करत विरोधकांनी चहापानावर टाकलेला बहिष्कार हा जनतेच्या वेदनांना वाचा फोडण्याचा आणि सरकारच्या कथित अपयशाचा तीव्र निषेध करण्याचा एक मार्ग असल्याचे स्पष्ट केले आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांची दूरदृष्टी आणि विरोधकांचा प्रखर पहारा या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आणि पूरक असतात. निसर्गाचे संकट उंबरठ्यावर असताना, सरासरी पाऊस खालावलेला असताना आणि बळीराजा चातकासारखा आकाशाकडे डोळे लावून बसला असताना, लोकप्रतिनिधींनी सभागृहाचा अमूल्य वेळ केवळ एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात आणि राजकीय चिखलफेकीत वाया घालवणे राज्याला अजिबात परवडणारे नाही. तात्पुरत्या राजकीय घोषणा आणि लोकप्रियतेच्या मोहापलीकडे जाऊन जेव्हा कठीण पण शाश्वत विकासाचे निर्णय घेतले जातात, तेव्हाच खऱ्या अर्थाने लोकशाही परिपक्व होत असते. राजकारण हे सत्तेच्या तात्पुरत्या गणितांवर चालत असले, तरी समाजकारण हे पुढच्या पिढीच्या भविष्यावर बेतलेले असते. जेव्हा निसर्ग डोळे वटारतो, तेव्हा कोरडा पडणारा सातबारा फक्त शासकीय कागदावर कोरा होऊन चालत नाही, तर तो शेतकऱ्याच्या आयुष्यात समृद्धीचा खरा रंग भरणारा असावा लागतो. पाऊस नसल्याने आलेले संकट अत्यंत चिंताजनक आहे. सत्ताधाऱ्यांचे धोरणात्मक नियोजन आणि विरोधकांची जनतेप्रति असलेली प्रखर जाणीव या दोन्हींचा सुवर्णमध्य साधला गेला, तरच या अधिवेशनाचे सार्थक होईल. आगामी तीन आठवड्यांत होणारे विचारमंथन महाराष्ट्राला शाश्वत विकासाची नवीन दिशा देईल की केवळ राजकीय संघर्षाचे मैदान ठरेल, हे आता लोकप्रतिनिधींच्या विवेकबुद्धीवर आणि जनतेच्या जागरूक मूल्यमापनावर अवलंबून आहे.

# ब्रम्हपुरी-आरमोरी महामार्गावर मृत्यूचा सापळा!

**रस्त्याला पडलेल्या भेगांकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष; अपघाताची टांगती तलवार**

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी-आरमोरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ डी हा ब्रम्हपुरी मार्गे नागपूर आणि आरमोरी मार्गे गडचिरोलीला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग आहे. या मार्गावर दररोज हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. काही वर्षांपूर्वी या महामार्गाचे रुंदीकरण करून सिमेंटीकरण करण्यात आले होते. मात्र, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून ठिकठिकाणी मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत.




रस्त्यावरील या भेगांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून दुचाकीस्वार आणि लहान वाहनधारकांसाठी हा मार्ग धोकादायक ठरत आहे. अचानक येणाऱ्या भेगांमुळे वाहनांचा तोल जाऊन किरकोळ अपघात घडत आहेत. भविष्यात याच कारणामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे या महामार्गाची देखभाल आणि पाहणी करण्याची जबाबदारी असलेल्या राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि अभियंते या मार्गावरून नियमित प्रवास करतात. मात्र त्यांना रस्त्याची ही दयनीय अवस्था दिसत नाही का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या मार्गावर यापूर्वी अनेक गंभीर अपघात झाले असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. असे असतानाही प्रशासनाकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय महामार्गाची काही वर्षांतच झालेली ही अवस्था कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या रस्त्याची तातडीने पाहणी करून भेगा बुजवाव्यात व आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे. अन्यथा हा महामार्ग प्रवाशांसाठी सुविधा नसून मृत्यूचा सापळा ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


# महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, बेटाळाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



प्राजक्ता खोब्रागडे ८०.१८ टक्के



अनम खान ८०.०० टक्के




नंदिनी किर्तनिया ७१.६० टक्के



सोनल लांजेवार ६७.९० टक्के



पवन मेहंदडे ९२.०० टक्के



आदिती कोटगळे ९०.५० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल ऐजुकेशन मुंबई (MSBTE) द्वारा नुकत्याच घेण्यात आलेल्या परीक्षेत डी.फॉर्म प्रथम तसेच अंतिम वर्षातील आणि एडीएमएलटी विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करून महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला.

या निकालात डी. फार्म प्रथम वर्षीय विद्यार्थिनी कू. नंदिनी निहार कीर्तनिया हीने ७१.६० टक्के प्राप्त करून प्रथम स्थान पटकाविले. तसेच सोनल दिवाकर लांजेवार हिने ६७.९०टक्के प्राप्त करून द्वितीय स्थान पटकाविले. आणि कु. श्वेता भागवत मेश्राम ६७.२० टक्के प्राप्त करून तृतीय स्थान पटकाविले. डी. फार्म अंतिम वर्षीय प्राजक्ता उत्तम खोब्रागड़े हीने ८०.१८ टक्के प्राप्त करून प्रथम स्थान पटकाविले. आणि अनम अश्मिरा इब्राहिम खान हिने ८०.०० टक्के प्राप्त करून द्वितीय स्थान पटकाविले. आणि कु. अनुपमा भाष्कर डोरिवर ७८.०९ टक्के प्राप्त करून तृतीय स्थान पटकाविले. आणि एडीएमएलटी (पी.जी.डी.एम.एल.टी.) चे विद्यार्थी पवन मेहंदडे याने ९२.०० टक्के प्राप्त करून प्रथम स्थान पटकाविले. तसेच आदिती कोटगळे याने ९०.५० टक्के प्राप्त करून द्वितीय स्थान पटकाविले. आणि कु. पूनम शहारे ९०.१७ टक्के प्राप्त करून तृतीय स्थान पटकाविले.

निकालाची टक्केवारी ९७.४३ प्राप्त झाली आहे. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष देवेंद्रजी पिसे यांनी अभिनंदन केले आहे.

## विनोदिनी

बायको : अहो, तुमच्या डोक्याला टेंगुळ का आलय, पण रात्री तर हे टेंगुळ नव्हतं मग अचानक आलं कसं.

नवरा : रात्री वॉशरूमला जाताना चुकून तुझा पाय माझ्याकडून तुडावाला गेला आणि तू मला झोपेत तांब्या फेकून मारला होता, त्यामुळं टेंगुळ आलं.

बायको : मग मला का उठवलं नाही.

नवरा : मला वाटलं चुकून झालं तर तांब्या मारलं, मुद्दाम उठवलं तर हंडा फेकून मारशील, म्हणून नाही उठवलं.

# हार्वेस्टरसाठी कर्ज मिळवून देण्याच्या बहाण्याने शेतकऱ्याची फसवणूक

## नागपूरच्या भामट्या फायनान्सरविरूद्ध ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

ब्रम्हपुरी/का.प्र.

शेती व्यवसायाला आधुनिकतेची जोड देण्यासाठी नवीन हार्वेस्टर खरेदी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बोंडेगाव येथील एका तरुण शेतकऱ्याला कर्ज मंजूर करून देण्याच्या नावाखाली १२,५०० रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ब्रम्हपुरी पोलिसांनी नागपूर येथील संशयित फायनान्सर हेमंत जोशी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, या भामट्याला चंद्रपूर पोलिसांनी आधीच पुणे येथून अशाच एका फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक केली असल्याची माहिती समोर आली आहे.

ब्रम्हपुरी शहरातील बोंडेगाव वार्ड येथील रहिवासी विलास दयाराम करंबे (वय ३०) हे आपल्या कुटुंबासह राहून वडिलोपार्जित ३ एकर शेती करतात. शेतीकामासाठी व व्यवसाय वाढवण्यासाठी त्यांना शासनाच्या अनुदानावर (सबसिडी) नवीन हार्वेस्टर खरेदी करायचे होते. यासाठी त्यांनी शोध सुरू केला असता, हार्वेस्टर कंपनीचे मालक सचिन चंदबावणे यांनी विलास यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधला. विलास यांनी कर्ज काढून हार्वेस्टर घेण्याची इच्छा दर्शविल्यावर, चंदबावणे यांनी त्यांना 'पुनावाला फिनफार्म, नागपूर' या कंपनीचा फायनान्सर हेमंत जोशी (मो. क्र. ९९६०७९६११८) याचा नंबर दिला. दिनांक १३ मे २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजताच्या सुमारास फायनान्सर हेमंत जोशी हा थेट विलास करंबे यांच्या बोंडेगाव येथील घरी पोहोचला. त्याने कर्ज प्रक्रियेची सर्व माहिती समजावून सांगत विलास यांच्याकडून बँक पासबुक, ३ कोरे चेक आणि कर्जाच्या विविध कागदपत्रांवर सह्या घेतल्या. तसेच 'कागदपत्रे तयार करण्याचा चार्ज' म्हणून १२,५०० रुपयांची मागणी केली. विलास यांनी विश्वास ठेवून ऑनलाईन क्युआर कोड (QR Code) स्कॅन करून 'वृषभ संजयराव इकार' या नावाने ते पैसे ट्रान्सफर केले.

तीन ते चार दिवसांनी हेमंत जोशी याने विलास यांना फोन करून 'तुमचे १५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर होत आहे,' असे सांगितले. मात्र, विलास यांनी 'मला १५ लाख नको, फक्त ९,५०,००० रुपये हवे आहेत,' असे स्पष्ट केले. त्यावर जोशी याने डाऊन पेमेंट करण्यास सांगितले. विलास यांनी चार-पाच दिवसांत डाऊन पेमेंट करतो असे म्हणताच जोशी याने फोन बंद केला. त्यानंतर विलास यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, हेमंत जोशीचा मोबाईल नंबर सतत बंद येत होता. दरम्यान, १८ जून २०२६ रोजी सकाळी हार्वेस्टर डीलर सचिन चंदबावणे यांनी विलास यांना फोन करून धक्कादायक माहिती दिली. फायनान्सर हेमंत जोशी याने अनेकांची फसवणूक केली असून, चंद्रपूर पोलिसांनी त्याला पुणे येथून अटक केल्याचे समजले. आपलीही १२,५०० रुपयांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विलास करंबे यांनी थेट ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन गाठून तोंडी तक्रार दिली. विलास करंबे यांच्या रिपोर्टवरून ब्रम्हपुरी पोलिसांनी आरोपी हेमंत जोशी (रा. नागपूर) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ३१६ (२) (फसवणूक) अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# युराणी बागडे हिचा भाजप पक्षाकडून सन्मान

ब्रम्हपुरी/का.प्र.

वांद्रा येथील भाजपा महिला आघाडीच्या वतीने १२ वी



परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वांद्रा येथील विद्यार्थिनी कु. युराणी भाऊराव बागडे यांचा सत्कार करण्यात आला. भाजपा युवा मोर्चा चंद्रपूर जिल्हाध्यक्ष तनय देशकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाद्वारे विद्यार्थिनीच्या यशाचा गौरव करण्यात आला.

यावेळी भाजपा पदाधिकाऱ्यांनी कु. युराणी बागडे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देणे हीच समाजाच्या प्रगतीची खरी दिशा असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या प्रसंगी कविताताई पाल, नलूबाई पाल, वैशालीबाई उरकुडे, भाविकाबाई बागडे, नलिनाबाई हारगुळे, सुनंदाबाई मेश्राम, नव्या उरकुडे यांच्या सह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन



नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष गणेश तर्वेकर व सचिव अजय काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात प्राचार्या, मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांना सुट्टया असल्याने कार्यक्रमात विद्यार्थी संख्या कमी होती तर काही माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्तपणे सहभाग होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्या शुभांगी पोहेकर व मुख्याध्यापिका संगीता नारनवरे यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित करत नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होत असल्याचे सांगितले. त्यानंतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केले. सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, पद्मासन तसेच अनुलोम-विलोम यांसारख्या योगप्रकारांचा सराव करण्यात आला.

प्रसंगी प्राचार्या शुभांगी पोहेकर म्हणाल्या, 'निरोगी शरीर आणि निरोगी मनासाठी योग हा प्रभावी मार्ग आहे. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश केल्यास आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते.' मुख्याध्यापिका संगीता नारनवरे यांनी सांगितले, 'योगामुळे एकाग्रता, आत्मविश्वास आणि सकारात्मकता वाढण्यास मदत होते. प्रत्येकाने नियमित योगाभ्यासाचा संकल्प करावा.'

# पेरणीसाठी बळीराजा पावसाकरीता आतुर



ब्रम्हपुरी/का.प्र.

मृग नक्षत्र संपला. आद्रा लागल्या. आकाशात काळेकुट्ट ढग, विजांचा लखलखाट मेघगर्जना सुरू परंतु पावसाच्या एका थेंबाचाही पत्ता नाही. पाण्या पावसाभावी काही शेतकऱ्यांचे धानाचे परे कडक उन्हामुळे बरोबर वापले नाही. काही शेतकऱ्यांचे रोवणी साठी तयार झालेले परे पाऊस न पडल्यामुळे वाळतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

हजारो रुपयाची बिजाई घेऊन टाकलेले परे वाळले तर समोरील भविष्यातील जीवन कसे जगावे अशी भीती बळीराजाला पडली आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी अजूनही आवत्या धानाची पेरणी शेतात केलेली नाही, शेतीच्या हंगामाला सुरुवातच केली नाही. पावसामुळे शेतीचा हंगाम झाला नाही तर या महागाईच्या काळात काय खावे , कसे जगावे, मुला मुलींचे शिक्षण , सोयऱ्या धायऱ्याच्या घरचे कार्यक्रम कसे करावे आणि पडणाऱ्या दुष्काळाला कसे तोंड द्यावे याचा विचार शेतकरी, मजूर वर्ग करीत आहे.

ह्यावर्षी पाऊसच पडला नाही किंवा पावसाचे प्रमाण कमी राहिले तर पिण्याच्या पाण्याची सुद्धा कमतरता भासून पाण्याविना पाळीव गुरे- ढोरे, जंगली प्राणी, हजारो लाखोच्या संख्येने मानव मृत्युमुखी पडल्याशिवाय राहणार नाहीत अशी भीती शेतकरी व नागरिक बोलून दाखवित आहेत. तसेच देवाला साकडे घालत आहे.

# नामांकित ब्रँडचे बनावट वजनकाटे विकणारे दोन भाऊ गजाआड

## शार्प इन्स्ट्रुमेंट व सनसुईकॉन ब्रॅण्डची फसवणूक

ब्रम्हपुरी/का.प्र.

दुसऱ्याच्या नामांकित कंपनीचा ब्रँड आणि बनावट बिल बुक वापरून बनावट, विना परवाना (नॉन-स्टँडर्ड) वजनकाट्यांची बाजारात बेकायदेशीर विक्री करणाऱ्या दोन सख्ख्या भावांचा पर्दाफाश झाला आहे. नागपूर येथील महिला उद्योजिका मनिषा खोमदेव सालोडकर यांच्या तक्रारीवरून ब्रम्हपुरी पोलिसांनी आरोपी आशिष मधुकर पारधी आणि सुरज मधुकर पारधी यांच्याविरुद्ध फसवणूक व कॉपीराईट कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. वैधमापन शास्त्र विभाग आणि पोलिसांनी या रॅकेटचा भांडाफोड करत बेकायदेशीर वजनकाटे जप्त केले आहेत.

नागपूरच्या हुडकेश्वर रोड येथील रहिवासी मनिषा सालोडकर यांची सन २०११ पासून 'श्री. साई स्केल कंपनी' असून त्याअंतर्गत 'sunsuicon' (सनसुईकॉन) या ब्रँडचे वजनकाटे उत्पादित केले जातात. तर त्यांचे पती खोमदेव सालोडकर यांची 'मेसर्स शार्प इन्स्ट्रुमेंट' ही वजनकाटे उत्पादन कंपनी आहे. आरोपी आशिष पारधी (वय ३५, रा. उदापूर, ब्रम्हपुरी) हा २०१८ पासून खोमदेव सालोडकर यांच्याकडे कमिशन एजंट म्हणून काम करत होता. विश्वास संपादन केल्यानंतर त्याने स्वतःचा विक्री परवाना घेतला आणि सालोडकर यांच्या कंपनीकडून वजनकाटे विकत घेऊन ब्रम्हपुरी येथील आरमोरी रोडवरील दुकानातून विकू लागला. २०२४ पर्यंत हा व्यवसाय सुरळीत चालला. सन २०२५ पासून आशिष पारधी आणि त्याचा भाऊ सुरज पारधी (वय ३२) यांनी संगनमत करून जास्तीच्या नफ्यासाठी मूळ कंपनीची फसवणूक सुरू केली. ते अहमदाबाद (गुजरात) आणि गोंदिया येथून ७० टक्के जीएसटी बिल नसलेले, विना ब्रँडचे फेब्रिकेटेड व मॉडेल अप्रूव्हल नसलेले नॉन-स्टँडर्ड वजनकाट्यांचे सुटे भाग गिरनार ट्रान्सपोर्टने मागवू लागले. या बनावट काट्यांवर ते मनिषा सालोडकर यांच्या मालकीच्या 'sunsuicon' ब्रँडचे स्टीकर बेकायदेशीरपणे लावून बाजारात विकत होते. इतकेच नव्हे तर, त्यांनी ग्राहकांना देण्यासाठी 'शार्प इन्स्ट्रुमेंट' कंपनीचे बनावट बिल बुकही छापले होते.

२९ मे २०२६ रोजी पती खोमदेव सालोडकर यांनी ब्रम्हपुरी येथील दुकानाला अचानक भेट दिली असता हा सर्व गैरप्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यांनी दुकानातून पुराव्यासाठी बनावट बिले ताब्यात घेतली आणि वैधमापनशास्त्र विभाग चंद्रपूरकडे तक्रार केली. दिनांक १ जून २०२६ रोजी वैधमापन शास्त्र विभागाचे ३ अधिकारी आणि खोमदेव सालोडकर यांनी ब्रम्हपुरी येथील लोकरे कॉम्प्लेक्समधील दुकानावर छापा टाकला. कारवाईची कुणकुण लागताच आरोपींनी आदल्या दिवशी रात्री ११ वाजताच्या सुमारास सर्व बेकायदेशीर काटे उदापूर येथील एका घरात लपवून ठेवले होते. मात्र, अधिकाऱ्यांनी शोध घेऊन सर्व बनावट व छेडछाड केलेले वजनकाटे जप्त केले व त्यांचा कायदेशीर पंचनामा केला. तक्रारदार महिला उद्योजिका मनिषा सालोडकर या परदेशात गेल्या असल्याने, त्यांनी परत आल्यानंतर सर्व प्रकरणाची खातरजमा केली आणि १६ जून २०२६ रोजी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन गाठून अधिकृत तक्रार नोंदवली.

ब्रम्हपुरी पोलिसांनी दोन्ही आरोपी भाऊ आशिष पारधी व सुरज पारधी यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३१६ (२) (फसवणूक) आणि प्रतिलिपि अधिकार अधिनियम (कॉपीराईट ॲक्ट) १९५७ चे कलम ६३ व ६७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या मोठ्या कारवाईमुळे बनावट वजनकाटे बनवणाऱ्या व ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# ब्रम्हपुरीत मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस

## विधीसंघर्ष बालकाकडून दुचाकी जप्त



ब्रम्हपुरी/का.प्र.

शहरातील नागेश्वर नगर भागातून चोरीला गेलेली मोटारसायकल शोधण्यात ब्रम्हपुरी पोलिसांना यश आले आहे. गोपनीय बातमीदाराने दिलेल्या अचूक माहितीच्या आधारे पोलिसांनी एका विधीसंघर्ष बालकाच्या (नाबालिग) घरातून चोरीची दुचाकी जप्त केली असून, गुन्ह्याचा यशस्वी पर्दाफाश केला आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्रम्हपुरी येथील नागेश्वर नगर रहिवासी आणि दुचाकी शोरुमचे चालक जगदिश राजिराम सहारे (वय ४३ वर्षे) यांची स्प्लेंडर एक्स टेक २.०' (क्रमांकः एम.एच. ३४ सि.के. ८४५२, किंमत अंदाजे ६० हजार रुपये) ही मोटारसायकल अज्ञात चोराने पळवून नेली होती. सहारे यांनी ३ जून २०२६ रोजी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या तोंडी रिपोर्टवरून पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ५०६/२०२६, कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मुकेश गजबे हे या गुन्ह्याचा तपास करत होते. चोरीस गेलेली मोटारसायकल व अज्ञात आरोपीचा शोध घेत असतानाच, गुन्हे शोध पथकाला त्यांच्या खासगी बातमीदाराकडून एक महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ संशयित विधीसंघर्ष बालकाच्या घरी जाऊन पाहणी केली. पोलिसांना पाहणी दरम्यान सहारे यांची चोरीला गेलेली 'स्प्लेंडर' मोटारसायकल त्या बालकाच्या घरातच मिळून आली. पोलिसांनी ती दुचाकी जप्त केली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगिरी चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, ब्रम्हपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे आणि पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली. या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोलीस हवालदार मुकेश गजबे, पोलीस अंमलदार प्रविण भिवगडे, निलेश तुमसरे, इर्शाद खान, स्वप्नील पळसपगार आणि वशिष्ट रंगारी यांनी मोलाची भूमिका बजावली.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri
samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात डॉ. धनराज खानोरकरांचा पाठ



ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथील मराठी विभागप्रमुख तथा कवी, लेखक, स्तंभलेखक व पत्रकार डॉ.धनराज खानोरकर यांच्या प्रसिद्ध 'संजोरी' ललित ग्रंथातील 'पहाटेची काकड आरती म्हणजे अध्यात्मिक विविध भारती' हा लेख संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात बी.ए.२,सत्र – ४ करिता मायनर डीएसई मराठी साहित्य, अभ्यासपत्रिकाः वैदर्भीय निवडक गद्य 'मुक्ताक्षरे' पुस्तकात घेण्यात आला असून डॉ धनराज खानोरकरांना विद्यापीठाने कळविले आहे. ते ३३ व्या झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्षही राहिले आहेत.

डॉ.खानोरकरांचे ०५ कवितासंग्रह, सहा संपादित ग्रंथ व 'संजोरी' हा झाडी बोलीतील लोकोत्सव व लोककलेवरचा बहुचर्चित ललितग्रंथ प्रकाशित असून 'संजोरी' ग्रंथ गोंडवाना विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. याशिवाय त्यांनी ४० संशोधन पेपर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रिसर्च जर्नलमध्ये प्रकाशित केले आहेत. ते प्रसिद्ध वक्ते असून अनेक ठिकाणी त्यांनी उद्बोधनपर व्याख्यानेही दिली आहेत. 'काळोखातले काजवे' हा व्यक्तिचित्रण लेखसंग्रही त्यांचा लवकरच येतो आहे. याबद्दल ने.हि. शिक्षण संस्थेचे अध्यक्षा स्नेहलता भैया, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, समस्त प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मित्रमंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# ब्रम्हपुरीत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

## योगासने, योगनृत्य आणि कराटे प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष



ब्रह्मपुरी/का.प्र.

'करे योग, रहे निरोग' असा संदेश देत ब्रह्मपुरी येथे आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. ब्रह्मपुरी योग समिती, लोकमान्य टिळक विद्यालय, योग नृत्य परिवार (टिळक नगर), हास्य योगा ग्रुप (शारदा कॉलनी) आणि आंतरराष्ट्रीय योगा मार्गदर्शक डॉ. तरल नागमोती व त्यांच्या ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक ज्युनिअर कॉलेजच्या प्रांगणात या सामूहिक योग साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे शानदार उद्घाटन पंचायत समिती ब्रह्मपुरीच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. विद्या शेळके यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी मंचावर ब्रह्मपुरी योग समितीचे अध्यक्ष अनिल चिलमवार, लोकमान्य टिळक विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास धोंगडे, पंढरीनाथ खानोरकर, प्राचार्य सुयोग बाळबुध्दे, प्रा. प्रकाश बगमारे आणि सखी मंचच्या अलका खोकले आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अनिल चिलमवार यांनी केले, तर सूत्रसंचालन भगवान कन्नाके यांनी उत्तमरीत्या हाताळले.

सकाळी ५:३० वाजल्यापासून सुरू झालेल्या या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. कार्यक्रमात विविध आकर्षक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. आंतरराष्ट्रीय योगा मार्गदर्शक डॉ. तरल नागमोती आणि त्यांच्या ग्रुपने शरीर व मन सुदृढ ठेवणारी विविध योगासने करून दाखवली व त्याचे महत्त्व पटवून दिले. सोबतच शीलाताई चौधरी यांच्या 'योगा नृत्य परिवार' ग्रुपने योग आणि नृत्याचा सुंदर मेळ घालत 'योग नृत्य' सादर केले. तसेच गणेश लांजेवार यांच्या कराटे असोसिएशनच्या वतीने स्वसंरक्षणाचे धडे देणारे चित्तथरारक कराटे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यावेळी विजया पाटणकर यांनी निरोगी जीवनात हास्ययोगाचे काय महत्त्व आहे हे सांगून उपस्थितांकडून हास्ययोगाचा सराव करून घेतला, ज्यामुळे संपूर्ण परिसर हास्याने डवरून गेला.

हा योगोत्सव केवळ एक दिवसापुरता मर्यादित न राहता नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करावा, असे आवाहन समिती तर्फे करण्यात आले. ब्रह्मपुरी येथील लोकमान्य टिळक वाचनालय येथे दररोज सकाळी ५:३० ते ७:३० या वेळेत नियमित योगा क्लास सुरू राहणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

हा भव्य कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाळक्रिष्ण शेळके, प्रकाश घोरुडे, दिलीप जुमडे, मनोहर कोरानकर, राजू भागवत आणि गजानन बुरले, मेघा बांगरे, आशा सोंदरकर यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला ब्रह्मपुरीतील आबालवृद्धांसह ग्रामीण रुग्णालयाच्या डॉ. खरकाटे मॅडम, पोलीस विभागाचे अधिकारी, कर्मचारी नागरिक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❀❀❀❀❀❀

---

# ग्रामपंचायतची देयके अडल्याने विकासकामे ठप्प

नागभीड/प्रतिनिधी

नागभीड जिल्ह्यातील बहुतांश ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर सध्या प्रशासकराज सुरू आहे. येत्या सहा महिन्यांत निवडणुका पार पडतील असे चित्र दिसत नाही. त्यामुळे शासनाने न्यायालयीन निर्णयानुसार कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायत वर प्रशासकीय समित्या नेमल्या. मात्र प्रशासक, सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्या प्रशासकीय समिती ला न्यायालयीन आदेशानुसार आर्थिक अधिकार नसल्यामुळे विविध विकास योजनांतर्गत पूर्ण झालेल्या कामांची देयके रखडली आहेत. परिणामी कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असून ग्रामीण भागातील विकासकामांनाही मोठा फटका बसत आहे. तर आम्ही केवळ दिखाव्यासाठी प्रशासकीय समितीत आहोत अशी भावना समिती सदस्यांची झाली आहे.

जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमार्फत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, सार्वजनिक बांधकामे आदी विविध विकासकामे वेगवेगळ्या योजनेतून पूर्ण करण्यात आली आहेत. या कामांमुळे गावांतील मूलभूत समस्या दूर होण्यास मदत झाली असली तरी पूर्ण झालेल्या कामांची लाखो रुपयांची बिले अद्याप प्रलंबित आहेत. ग्रामपंचायत कडे निधी उपलब्ध आहे, पण कुणाच्या सहीने व अधिकाराने देयके मंजूर करावी हा यक्षप्रश्न उभा ठाकला आहे. प्रशासकीय अडचणी व आर्थिक अधिकारांचा अभाव यामुळे देयके मंजूर होत नसल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भात विविध ग्रामपंचायतींतील कंत्राटदारांनी नाराजी व्यक्त केली असून, देयके वेळेत न मिळाल्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. कामांसाठी घेतलेले कर्ज, मजुरांचे वेतन व इतर खर्च भागविणे कठीण झाले असल्याचे कंत्राटदारांचे म्हणणे आहे. काम पूर्ण झाल्यानंतर व निधी प्राप्त होऊनही अनेक महिन्यांपासून देयके रखडल्याने भविष्यात ग्रामपंचायतींची कामे घेण्याबाबतही कंत्राटदार साशंक आहेत. माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गजपुरे यांनीही या प्रश्नाकडे लक्ष वेधत. देयकांच्या अभावामुळे विकासकामे प्रभावित होत असल्याचे सांगितले. ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक समिती नेमण्यात आली असली तरी आर्थिक अधिकार नसल्याने कामांची देयके अडकून पडली आहेत. शासनाने यावर तातडीने निर्णय घेऊन निधी वितरणाची प्रक्रिया गतीमान करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अडकलेल्या देयकांचा निधी तात्काळ वितरित करण्याची मागणी केली आहे. देयके वेळेत न मिळाल्यास कंत्राटदार ग्रामपंचायतींची नवीन कामे घेण्यास टाळाटाळ करतील, त्यामुळे ग्रामीण भागातील विकास योजनांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## - निधन वार्ता -



माजी सरपंच, माजी नगरसेवक न. प. ब्रम्हपुरी प्रल्हाद सहारे यांचे मंगळवार, दिनांक २३/६/२०२६ रोजी रात्री ११.३० वा. दीर्घ आजाराने प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर अंत्यसंस्कार दि.२४/६/२०२६ ला सकाळी ब्रम्हपुरी स्मशानभूमीत पार पडले.

---

# नंदिनी प्रधानचा भाजपा ओबीसी मोर्चाद्वारे सत्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

पांडेचरी येथे आयोजित राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करून सुवर्णपदक प्राप्त केल्यामुळे मूळची ब्रह्मपुरी येथील व सध्या राजनांदगाव येथे शिक्षण घेत असलेल्या नंदिनी माधवराव प्रधान ने ब्रम्हपुरी शहराच्या शिरपेच्यात एक मानाचा तुरा रोवला आहे. तिला प्रोत्साहन देण्यासाठी भाजपा ओबीसी मोर्चा ब्रह्मपुरी शहर तर्फे नंदिनी प्रधान च्या मालडोंगरी रोड, नागेश्वर नगर येथील घरी जाऊन अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे, ब्रह्मपुरी शहर ओबीसी मोर्चा अध्यक्ष प्रा दिलीप जुमडे, राजू भागवत, प्रा डॉ अशोक सालोडकर, अशोक मस्के, घनश्यामजी सूर्यवंशी, कोरानकर सर, राजकुमार प्रधान व अन्य उपस्थित होते.

---

### ... QUOTES ...

"Failures are part of life. If you don't fail, you don't learn. If you don't learn you'll never change."

- Unknown

---

**चारोळी**

दिल्लीत बसले मनमोहन तरी
देशाची परिस्थिती केविलवाणी...
दिल्लीत बसली सोनिया तरी,
देशाहाती कथलाचा वाळा नाही...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# एलएमबी पब्लिक स्कुल येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा



ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून या वर्षी सुध्दा एल. एम. बी पब्लिक स्कुल, ब्रम्हपूरी येथे हा दिवस आनंदाने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका तथा शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

योग हा जीवनाचा महत्वाचा भाग आहे. जीवनाला परीपुर्णता देण्यासाठी योग आवश्यक आहे. यावेळी एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या योग शिक्षिका पुजा हर्षे मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे योग शिबिर घेतले. क्लॅप योगा, सुर्य नमस्कार तसेच भस्त्रीका, भ्रामरी, प्राणयाम घेण्यात आला व सर्वात शेवटी ध्यान करून योग शिबीराचे समापन करण्यात आले.

आजाच्या या धकाधकीच्या जिवनात प्रत्येक व्यक्तिला ताण-तनावाचा सामना करावा लागतो. म्हणूनच योगाचा आपल्या दैनंदिन जीवनात समावेश करून आपण आपले जिवन तनावमुक्त व आरोग्यदायी बनवू शकतो.

या शिबीरासोबतच शाळेतील सर्व कर्मचारी वर्गासाठी तिन दिवसीय योग शिबीराचे देखिल आयोजन करण्यात आले. ज्याद्वारे सर्व सहभागींनी सहजतेचा व आंतरीक आनंदाचा व मनशांतीचा अनुभव घेतला.

शिबीराच्या शिक्षिका पूजा हर्षे ज्या गेल्या २० वर्षापासुन 'आर्ट ऑफ लिव्हींग' या संस्थेमार्फत लोकांना आनंदाची अनुभूती व आरोग्यदायी जीवनासाठी शिबीर घेतात, त्यांच्या मार्गदर्शनासोबत हा कार्यक्रम शाळेमध्ये यशस्वीरित्या पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने ह्या कार्यक्रमाचे समापन करण्यात आले.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.





# बोगस प्रमाणपत्रे देऊन लाटली...

(पान क्र. १ वरून)

वाटाघाटीनंतर मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शन, नागपूर यांची २० कोटी ४७ लाख ९२ हजार ८१२ रुपयांची निविदा अंतिम करण्यात आली. फर्मचे प्रोजेक्ट मॅनेजर अमर शेंडे यांनी कंत्राट मिळवण्यासाठी जोडलेली दोन्ही पूर्व-अनुभव प्रमाणपत्रे १०० टक्के बनावट असल्याचे एसीबीच्या पडताळणीत सिद्ध झाले. पाहिले प्रमाणपत्र (आदिलाबाद, आंध्र प्रदेश): 'मथडी वागू' धरणाच्या कामाचे हे प्रमाणपत्र होते. तिथल्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हे काम वैष्णवी कन्स्ट्रक्शनला कधीही उपकरारावर (सबलेट) दिले नव्हते. यावर अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी आणि खोटा शिक्का होता. दुसरे प्रमाणपत्र (अमरावती, महाराष्ट्र): 'लोणी ढवळगिरी' येथील कामाचे मूळ प्रमाणपत्र 'मे. मानिषा कन्स्ट्रक्शन'च्या नावावर होते. आरोपींनी मूळ नावाच्या ठिकाणी खाडाखोड करून स्वतःचे नाव 'मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शन' असे दाखवून शासनाची दिशाभूल केली.

**प्रकरण २: मे. होनाई कन्स्ट्रक्शनकडून ९ बोगस प्रमाणपत्रे सादर; १४.९६ कोटींचे कंत्राट पदरात :** घोडाझरी शाखा कालव्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी (सा.क्रं. २०५९० मी. ते २५६८० मी. चे मातीकाम व बांधकाम कट अँड कव्हर) सुमारे ११.६२ कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. हे कंत्राट मिळवण्यासाठी पुणे येथील मे. होनाई कन्स्ट्रक्शनचे मालक सुभाष सोपानराव पाटील यांनी ९ पूर्वअनुभव व नोंदणी प्रमाणपत्रे सादर केली होती. एसीबीने केलेल्या सखोल चौकशीत ही सर्वच्या सर्व ९ प्रमाणपत्रे पूर्णतः बनावट आणि खोट्या स्वाक्षऱ्या असलेली बोगस असल्याचे निष्पन्न झाले. पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि आय.टी.डी. सिमेंटेशन मुंबई या संस्थांनी आम्ही असे कोणतेही प्रमाणपत्र दिले नसून यावरील स्वाक्षऱ्या खोट्या असल्याचे स्पष्ट केले. या ९ पैकी २ बनावट प्रमाणपत्रांचा वापर करून तत्कालीन अधिकाऱ्यांनी मे. होनाई कन्स्ट्रक्शनला अपात्र असतानाही जाणीवपूर्वक पात्र ठरवले आणि १४.९६ कोटींचे कंत्राट बहाल केले.

नंदकुमार वडनेरे समिती आणि घाणेकर तज्ज्ञ समितीच्या अहवालानुसार, दोन्ही निविदांची अद्ययावत किंमत (Rate Escalation) काढताना तत्कालीन अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांशी संगनमत करून मोठा आर्थिक गैरव्यवहार केला. वैष्णवी कन्स्ट्रक्शन प्रकरणात व्हॅट, इन्शुरन्स, लेबर ॲमेनिटीजच्या नावाखाली ९३ लाख ६४ हजार रुपयांची नियमबाह्य वाढ करण्यात आली. होनाई कन्स्ट्रक्शन प्रकरणात अंदाजपत्रकात १८४ लक्ष रुपयांची (१.८४ कोटी रुपये) अवैध वाढ करण्यात आली.

जर नियमानुसार निविदेची किंमत काढली असती, तर कंत्राटदारांची बोली अनुक्रमे १०.२३टक्के आणि २०.५३टक्के आधिक्य आली असती. नियमानुसार १५टक्के पेक्षा जास्त आधिक्य असणारी निविदा मंजुरीसाठी मंत्रालयातील 'कार्यकारी समिती' किंवा 'निविदा समिती'कडे पाठवावी लागली असती. तिथे निविदा रद्द होण्याचा किंवा दर कमी केला जाण्याचा धोका होता. म्हणून, अधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे किंमत वाढवून हे आधिक्य अनुक्रमे ४.९५टक्के आणि ४.९७टक्के वर (म्हणजे ५टक्के च्या आत) आणले. महामंडळाच्या नियमानुसार ५टक्के पर्यंतच्या आधिक्याला थेट 'कार्यकारी संचालक' (MD) स्तरावर मंजुरी देण्याचे अधिकार होते. म्हणजेच, कंत्राटदारांना गैरफायदा मिळवून देण्यासाठी वरिष्ठ समितीला अंधारात ठेवून खालच्या स्तरावरच हा 'मंजुरीचा खेळ' खेळण्यात आला.

या दोन्ही स्वतंत्र उघड चौकशीनंतर ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात सोपान रामराव सूर्यवंशी - तत्कालीन मुख्य अभियंता, वि.पा.वि.म., नागपूर (दोन्ही गुन्ह्यांत आरोपी), संजय लक्ष्मण खोलापुरकर - तत्कालीन अधीक्षक अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूर (दोन्ही गुन्ह्यांत आरोपी), रोहीदास मारोती लांडगे - तत्कालीन कार्यकारी संचालक, वि.पा.वि.म., नागपूर (प्रकरण १), देवेंद्र परशुराम शिर्के - तत्कालीन कार्यकारी संचालक, वि.पा.वि.म., नागपूर (प्रकरण २), अमर उत्तम शेंडे - प्रोजेक्ट मॅनेजर, मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शन, नागपूर, टी. गंगाधर राव - आममुख्त्यार पत्र धारक, मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शन, नागपूर, मे. वैष्णवी कन्स्ट्रक्शन, नागपूर (भागीदारी फर्म आणि इतर भागीदार), सुभाष सोपानराव पाटील - मालक, मे. होनाई कन्स्ट्रक्शन, भोसलेनगर, पुणे या आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

Lubi
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404